इंडिया हाऊस क्र.२, फ्लॅट क्र.१९,
केम्प्स कॉर्नर, मुंबई-४०००२६.

जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या जाहीर सूचनाद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. दिलीप अंबरनाथ पेणकर व अवधूत दिलीप पेणकर (मयत भावना दिलीप पेणकर यांचे अनुक्रमे पती व मुलगा) दोघेही रा. बी/३०२, प्रशम को.ऑप.हौ.सोसायटी लि.,अमरकांत झा मार्ग, शिंपोली, बोरीवली(पश्चिम), मुंबई-४०००९२, हे मयत भावना दिलीप पेणकर यांच्या मालकीची सदनिका क्र. २०१, क्षेत्रफळ ५६० चौ.फुट , विंग 'एफ' दुसरा मजला, जयमाला अपार्टमेंट E & F विंग को.ऑप.हौ.सो.लि. निळेमोरे रोड, नालासोपारा(प), ता.वसई, जि.पालघर, ४०१२०३ यावर हक्क प्रस्थापित करू इच्छितात. मयत भावना दिलीप पेणकर ह्या मृत्युपत्र न करता दिनांक २०.०६.२०१५ रोजी मरण पावल्या. मयत भावना दिलीप पेणकर यांचे आमचे अशील यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही वारस अस्तित्वात नसल्यामुळे, आमचे अशील हे मयत भावना दिलीप पेणकर यांच्या वर उल्लेख केलेल्या सदनिकेवर योग्य त्या कायदेशीर प्रक्रिये चा अवलंब करून स्वतःचे हक्क प्रस्थापित करू इच्छितात.

वर उल्लेख केलेल्या सदनिकेवर आमच्या अशिलांनी स्वतःचे हक्क प्रस्थापित करण्यास कोणत्याही व्यक्तीची, वारसाची हरकत अथवा मयत भावना दिलीप पेणकर यांच्याशी हक्क किंवा हितसंबंध अथवा त्यांचे वारस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह हरकत खालील पत्यावर व्यक्तीशः कळवावी. जर मुदती मध्ये कुणाचीही हरकत नसल्यास मयत भावना दिलीप पेणकर यांचे कायदेशीर वारस म्हणून आमचे अशिलाना स्वतःचे हक्क प्रस्थापित करण्यास कोणताही अडथळा असणार नाही असे गृहीत धरण्यात येईल. आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झालेवर आमचे अशील यांचे कायमस्वरूपी हक्क प्रस्थापित होतील ह्याची नोंद घ्यावी व त्या नंतर आलेल्या कोणत्याही हरकतीची दखल घेतली जाणार नाही.

तारीख : ०७/०५/२०२१
ठिकाण : नालासोपारा

ॲड. महेश विजय भोसले
पत्ता - शॉप नं.१८, रचना अपार्टमेंट
पांचाळ नगर, नालासोपारा (प)
ता.वसई, जि.पालघर
मोबा.क्र. – ८४०८८६०४६२/९०२९७७१५६२

PUBLIC NOTICE

Notice is hereby given that Mrs. Lucy Melvyn Pereira is a owner of Flat No. 202, Shastrinagar No.3/A, 60 Feet Road, Bhayander (West), Dist.; Thane 401101. However Mrs. Lucy Melvyn Pereira expired on 03/08/2020 leaving behind only three daughters as legal heirs named (1) Samantha Melvyn Pereira (2) Ruela Raxon Rodricks (3) Jasmine Murgesh Nair, of said flat. Any person/s having any claim shall file an objection in writing along with documentary evidence at Flat No.208, Shastrinagar-3A, Dr. Ambedkar Road, Bhayander (West), Dist. Thane 401101 within 14 days from the date of this notice, failing which it shall be assumed that no any person/s has any claim whatsoever on the said flat, of which please take a note.

Poonam B. Talwar
Advocate, High Court

जाहीर सूचना

येथे सूचना देण्यात येत आहे की, **श्रीमती दिपांजली वासुदेव मुगुर्डेकर** यांनी कोअर हाऊस क्र.डी-२, क्षेत्रफळ ४० चौ.मी. बिल्टअप क्षेत्र, **गोराई(१) अजिंक्यतारा को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड,** प्लॉट क्र.११, आरएससी-२२, गोराई-१, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०००९१ ही जागा **श्री. सुधाकर धोंडु पवार** यांच्याकडून दिनांक ५.५.२००८ रोजीचे विक्री करारनामानुसार खरेदी केली आहे आणि तदनंतर त्यांनी उपरोक्त सदर कोअर हाऊस म्हाडा/डब्ल्युकडून पत्र क्र.डीवाय.सी.ओ./(डब्ल्यु)/एम.एम./३९४२ दि.०७.०५.२००८ नुसार हस्तांतर/नियमीत करण्यासाठी अर्ज केला होता आणि तदनंतर श्रीमती दिपांजली वासुदेव मुगुर्डेकर यांचे ११.०१.२०१६ रोजी शिरोळी पुलाची, कोल्हापूर, महाराष्ट्र येथे निधन झाले आणि तदनंतर त्यांचे पती श्री. वासुदेव जानु मुगुर्डेकर यांनी म्हाडा/डब्ल्यु यांच्याकडून पत्र क्र.ई.एम./डब्ल्यु/एम.एम./२०७४/२०१६ दि.२३.०५.२०१६ नुसार त्यांच्या नावे सदर कोअर हाऊस हस्तांतर/नियमीत करण्यासाठी अर्ज केला होता आणि त्यांचे ३०.०३.२०२१ रोजी मुंबई, महाराष्ट्र येथे निधन झाले, त्यांच्या पश्चात त्यांचे दोन कायदेशीर वारसदार नामे (१) श्रीमती सुलक्षणा नितीन जाधव (ऊर्फ सुलक्षणा वासुदेव मुगुर्डेकर), (२) श्री. ज्ञानेश वासुदेव मुगुर्डेकर आहेत. तदनंतर श्रीमती सुलक्षणा नितीन जाधव, मोठी बहीण यांनी सदर कोअर हाऊस क्र.डी-२, क्षेत्रफळ ४० चौ.मी. बिल्टअप क्षेत्र, **गोराई(१) अजिंक्यतारा को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड,** प्लॉट क्र.११, आरएससी-२२, गोराई-१, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०००९१ या जागेबाबतचे त्यांचे अविभाजीत सामायिक वारसाहक्क शेअर्स, अधिकार, हक्क व हित हे श्री. ज्ञानेश वासुदेव मुगुर्डेकर यांच्या नावे दिनांक ०७.०५.२०२१ रोजीचे दस्तावेज क्र.बीआरएल-७-२७६२-२०२१ धारक संयुक्त उपनिबंधक बोरिवली-७ मुंबई उपनगर यांचे कार्यालयात नोंदणीकृत दिनांक ०७.०५.२०२१ रोजीचे मुक्तता करारनामानुसार मुक्त केले आणि तदनुसार माझे अशील श्री. ज्ञानेश वासुदेव मुगुर्डेकर हे सदर सोसायटी आणि/किंवा म्हाडा बोर्ड यांच्याकडून सदर कोअर हाऊस जागेचे कायदेशीर हस्तांतर/नियमन करू इच्छित आहेत आणि सदर सोसायटीचे भांडवलात शेअर व हितासह कायदेशीर मालक आणि त्यांच्या नावे सदर जागेचे संपुर्ण अधिकार करू इच्छित आहेत.

जर कोणा व्यक्तीस उपरोक्त कोअर हाऊस जागा आणि/किंवा कायदेशीर वारसाहक्क दावासंदर्भात आणि/किंवा इतर दस्तावेज आणि/किंवा जागेबाबत किंवा भागावार कोणताही अधिकार, हक्क किंवा हित, तारण, अधिभार, भाडेपट्टा, मालकी हक्क आणि/किंवा अन्य इतर प्रकारे कोणताही दावा असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात कागदोपत्री पुराव्यांसह **ॲड. श्री. अनुज विनोद मोरे, वकील, मुंबई उच्च न्यायालय, कार्यालय पत्ता: एमओआर असोसिएटस्, ८५/डी-४, गोराई(१) विश्राम कोहौसो लि., आरएससी-१, गोराई(१), बोरिवली (प.), मुंबई-४०००९१** येथे सदर सूचना प्रकाशन तारखेपासून ७ दिवसांत कळवावे, अन्यथा असे समजले जाईल की, असे दावे कोणत्याही अटीशिवाय त्याग व स्थगित केले आहेत.

मुंबई, आज दिनांकीत ७ मे, २०२१.

अनुज विनोद मोरे
वकील, मुंबई उच्च न्यायालय

ग्लान्स फायनान्स लिमिटेड

सीआयएन:एल६५९२०एमएच१९९४पीएलसी०८१३३३
नोंदणीकृत कार्यालय: ५, किताब महल, १९२, डॉ.डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई-४००००१. **ई-मेल:**glance@glancefin.com,
वेबसाईट:www.glancefinance.com, **दूर.:**४०६६ ६६६६/६७, **फॅक्स:**४०६६ ६६७०

३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही व वर्षाकरिता लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचा अहवाल

(रु. लाखात) ईपीएस व्यतिरिक्त

तपशील	संपलेली तिमाही ३१.०३.२०२१ लेखापरिक्षित	संपलेले वर्ष ३१.०३.२०२१ लेखापरिक्षित	संपलेली तिमाही ३१.०३.२०२० लेखापरिक्षित
कार्यचलनातून एकूण उत्पन्न	८४.७३	४०७.४४	१०५.२०
कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष साधारण बाबपूर्व)	५१.२३	२४०.८४	(२६.८९)
करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष साधारण बाबनंतर)	५१.२३	२४०.८४	(२६.८९)
करानंतर कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष साधारण बाबनंतर)	४.७५	१२६.७९	(९६.१३)
कालावधीकरिता एकूण सर्वंकष उत्पन्न (कालावधीकरिता एकत्रित नफा/(तोटा) (करानंतर) आणि इतर सर्वंकष उत्पन्न (करानंतर))	१२०.७७	५४०.८७	(२२३.८३)
समभाग भांडवल	२२७.५२	२२७.५२	२२७.५२
उत्पन्न प्रतिभाग (रू.१०/- प्रत्येकी) (पुर्ननमुद)			
मूळ	०.२१	५.६२	(४.२६)
सौमिकृत	०.२१	५.६२	(४.२६)

टिप:

१. वरील वित्तीय निष्कर्षाचे लेखासमितीद्वारे पुनर्विलोकन करण्यात आले आणि ७ मे, २०२१ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत मान्य करण्यात आले. वैधानिक लेखापरिक्षकांनी अ-फेरबदल लेखा मत दिले आहेत.

२. कंपनी प्राथमिक स्वरुपात वित्त पुरवठा व गुंतवणूक प्रक्रियेत कार्यरत आहे आणि कंपनीचे मुख्य व्यवसायाभोवती असणारे अन्य प्रक्रियेत कार्यरत आहे. यापुढे सर्व प्रक्रिया फक्त भारतातच संचालित केले जातात आणि म्हणून कायद्याच्या कलम १३३ अन्वये विहित इंडएएस १०८ कार्यचलीत विभागनुसार वेगळा निष्कर्ष योग्य विभाग नाही.

३. संपुर्ण जगभरात व भारतात कोरोना वायरस (कोविड-१९) मुळे झालेल्या स्थितीने आर्थिक प्रक्रियेत मंदी आणली आहे. कंपनीने सदर साथीचा प्रभाव ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षादरम्यान त्यांच्या व्यवसाय कार्यचलनावर नोंदवला आहे. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाकरिता कंपनीचे महसूलावर सदर महामारीचा कोणताही साहित्यीक प्रभाव झालेला नाही.

यापुढे २७ मार्च, २०२० रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा (आरबीआय) १ मार्च, २०२० व ३१ मे, २०२० दरम्यान येणाऱ्या हफ्त्यांकरिता पात्र कर्जदारांना सवलत विस्तारीत करण्यात आली होती. यापुढे दिनांक २३ मे, २०२० रोजीचे आरबीआय अधिसुचनेनुसार पात्र कर्जदारांना ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत ३ महिन्यांच्या कालावधीकरिता सवलत वाढविण्यात आली होती. नियमाक पॅकेज कोविड-१९ नुसार घोषित केले आणि तदनुसार अशा लाभाचे विस्तार हे खाते मोजणीकरिता इंडएएस १०९ नुसार आमच्या जोखिमीमध्ये विशिष्ट वाढीत कोणताही परिणाम विचारात घेण्यात आलेला नाही.

सदर महामारीचा एकूण प्रभाव कंपनीच्या निष्कर्षात पुढील विकासावर अवलंबून असेल. जे कोविड-१९ महामारीची उच्च अनिश्चितता, समाविष्टता, इतर बाबी, काही नविन माहिती यामुळे आणि कंपनीद्वारे नियुक्त किंवा अनिवार्य शासनाचे प्रभाव किंवा प्रसार यामध्ये कोणतीही कारवाई समाविष्ट आहे. सुक्ष्म आर्थिक स्थितीवर अनिश्चितता आल्याने जागतिक आरोग्य महामारीचा प्रभाव सदर वित्तीय निष्कर्षाच्या मान्यतेनुसार अंदाजित आहे आणि पुढील आर्थिक स्थितीतील बदलावरील निरीक्षण करून कंपनीकडून पुढे अखंडीत ठेवले जाईल.

४. ३१ मार्च, २०२१ आणि ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरिताचे आकडे हे संपुर्ण वित्तीय वर्षासंदर्भात लेखापरिक्षित आकडे आणि ३१ डिसेंबर, २०२० आणि ३१ डिसेंबर, २०१९ रोजी संपलेल्या नऊमाहीपर्यंत अलेखापरिक्षित प्रकाशित वर्ष ते तारीख आकडे या दरम्यान ताळमेळ घालणारे आकडे आहेत जे मर्यादित पुनर्विलोकनावर अवलंबून आहे.

५. मागील कालावधी/वर्षाचे आकडे जेथे आवश्यक आहे तेथे पुनर्गठीत/पुनर्नमुद केले आहेत.

ग्लान्स फायनान्स लिमिटेडकरिता
सही/-
नरेंद्र कर्नावत
संचालक
(डीआयएन :०००२७१३०)

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०७ मे, २०२१

दी बॉम्बे बर्मा ट्रेडिंग कॉर्पोरेशन, लिमिटेड

पोस्ट बॉक्स क्र.१००७७
दूर.क्र.:+९१ २२ २२१९७१०१
फॅक्स:००९१-२२-२२०७ १६१२/६७७२
ई-मेल: writetous@bbtcl.com
वेबसाईट: www.bbtcl.com
सीआयएन: एल९९९९९एमएच१८६३पीएलसी००००२

नोंदणीकृत कार्यालय: ९, वॉलेस स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४००००१, भारत.

३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही व वर्षाकरिता लेखापरिक्षित एकमेव वित्तीय निष्कर्षाचा अहवाल

(रु.लाखात)

अ. क्र.	तपशील	संपलेली तिमाही ३१.०३.२०२१ (लेखापरिक्षित)	संपलेली तिमाही ३१.०३.२०२० (लेखापरिक्षित)	संपलेले वर्ष ३१.०३.२०२१ (लेखापरिक्षित)	संपलेले वर्ष ३१.०३.२०२० (लेखापरिक्षित)
१.	कार्यचलनातून एकूण महसूल (निव्वळ)	५६९३.५९	४७८५.९८	२०७६८.५५	२१४२८.४१
२.	करपुर्व निव्वळ नफा/(तोटा) #	(१२१५.७७)	(२२०२.२४)	३७९.१३	(१७७२.८२)
३.	करानंतर कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) #	(१०५०.६९)	(१७९५.१७)	२८०.३८	(१७०२.७५)
४.	कालावधीकरिता एकूण सर्वंकष उत्पन्न (कालावधीकरिता करानंतर एकत्रित नफा/(तोटा) व इतर सर्वंकष उत्पन्न)	(४९४.३४)	(१६४८.४७)	४०५.२४	(१४८२.४०)
५.	भरणा केलेले समभाग भांडवल (दर्शनी मुल्य रु.२/- प्रती)	१३९५.४४	१३९५.४४	१३९५.४४	१३९५.४४
६.	उत्पन्न प्रतिभाग (रु.२/- प्रती) (वार्षिकीकरण नाही)				
	अ. मूळ	(१.५१)	(२.५७)	०.४०	(२.४४)
	ब. सौमिकृत	(१.५१)	(२.५७)	०.४०	(२.४४)
७.	मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंद पत्रकात दिल्यानुसार पुर्नमुल्यांकीत राखीव वगळून राखीव	२१५५०.५५			

३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही व वर्षादरम्यान कोणतीही अपवादात्मक/विशेष साधारण नव्हती.

३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही व वर्षाकरिता लेखापरिक्षित एकत्रित वित्तीय निष्कर्षाचा अहवाल

(रु.लाखात)

अ. क्र.	तपशील	संपलेली तिमाही ३१.०३.२०२१ (लेखापरिक्षित)	संपलेली तिमाही ३१.०३.२०२० (लेखापरिक्षित)	संपलेले वर्ष ३१.०३.२०२१ (लेखापरिक्षित)	संपलेले वर्ष ३१.०३.२०२० (लेखापरिक्षित)
१.	कार्यचलनातून एकूण महसूल (निव्वळ)	३२०९५८.४३	२९३१८६.९१	१३३९६१७.५१	११८८९३३.८५
२.	कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा विशेष साधारण बाबपूर्व)	५०५८९.६३	४४९३३.७५	२३८९६९.३८	१७५१७७.५४
३.	करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष साधारण बाबनंतर)	४४३९१.३१	४०२६१.८७	२१२४२८.२२	१८६७५९.४७
४.	करानंतर कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष साधारण बाबनंतर)	२३२६८.२२	२७३१०.०८	१२७७७४.९१	१२८०३३.५८
५.	कालावधीकरिता एकूण सर्वंकष उत्पन्न (कालावधीकरिता करानंतर सर्वंकष नफा/(तोटा) आणि इतर सर्वंकष उत्पन्न)	२५८१७.३८	१४३०३.३६	१३४१८१.३२	१२६९९०.१८
६.	भरणा केलेले समभाग भांडवल (दर्शनी मुल्य रु.२/- प्रती)	१३९५.४४	१३९५.४४	१३९५.४४	१३९५.४४
७.	उत्पन्न प्रतिभाग (रु.२/- प्रती) (वर्ष अखेरीकरिता व्यतिरिक्त वार्षिकीकरण नाही)				
	अ. मूळ	८.१२	१२.९८	५२.९६	८५.७५
	ब. सौमिकृत	८.१२	१२.९८	५२.९६	८५.७५

टिप:

१. सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन २०१५ च्या नियम ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजसह सादर करण्यात आलेली त्रैमासिक व वार्षिक लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे सविस्तर नमुन्यातील उतारा आहे. त्रैमासिक व वार्षिक लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे संपूर्ण नमुना स्टॉक एक्सचेंजच्या www.bseindia.com व www.nseindia.com आणि कॉर्पोरेशनच्या www.bbtcl.com वेबसाईटवर उपलब्ध आहे.

२. कॉर्पोरेशनच्या लेखापरिक्षित एकत्रित वित्तीय निष्कर्ष हे कंपनी कायदा २०१३ चे कलम १३३ (कायदा) सहवाचिता भारतीय रोखे व विनिमय मंडळ (सेबी) (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन २०१५ चे नियम ३३ व ५२ नुसार विहित भारतीय लेखाप्रमाण (इंडएएस) नुसार तयार केले आहेत.

३. वरील लेखापरिक्षित एकमेव व एकत्रित वित्तीय निष्कर्षाचे लेखासमितीद्वारे ५ मे, २०२१ रोजी पुनर्विलोकन व शिफारस करण्यात आले आणि ०६ मे, २०२१ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत मान्य करण्यात आले.

४. संचालक मंडळाने त्यांच्या ६ मे, २०२१ रोजी झालेल्या सभेत ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता ६०% (दर्शनी मुल्य रु.२/- प्रत्येकीचे रु.१.२० प्रती शेअर) लाभांशाची शिफारस केली.

५. कॉर्पोरेशनचे उपकंपनीमधील आलेला ऐच्छिक निवृत्ती व भरपाई शुल्कबाबत वर दिलेल्या कालावधीकरिता अपवादात्मक बाब म्हणून नोंद करण्यात आली.

६. ३१ मार्च, २०२१ व ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरिताचे आकडे हे संपुर्ण वित्तीय वर्षासंदर्भात लेखापरिक्षित आकडे आणि संबंधित वित्तीय वर्षाच्या तृतीय तिमाहीपर्यंत प्रकाशित अलेखापरिक्षित वर्ष ते तारीख आकडे यादरम्यान ताळमेळ घालणारे आकडे आहेत. तृतीय तिमाही अखेरीपर्यंतचे आकडे हे पुनर्विलोकीत करण्यात आले होते आणि लेखावर अवलंबून नाही.

७. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाकरिता कॉर्पोरेशनचे निष्कर्ष हे वैधानिक लेखापरिक्षकाद्वारे लेखापरिक्षित केले आणि याबाबत त्यांनी अपात्र लेखा अहवाल दिला. लेखापरिक्षकांचा लेखा अहवाल नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) आणि बीएसई लिमिटेड (बीएसई) कडे सादर करण्यात आला आणि कॉर्पोरेशनच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

मंडळाच्या वतीने
दी बॉम्बे बर्मा ट्रेडिंग कॉर्पोरेशन, लिमिटेडकरिता

नेस वाडीया
व्यवस्थापकीय संचालक

दिनांक: ०६ मे, २०२१
ठिकाण: मुंबई

मुंबईत दिवसभरात ३,०३८ रुग्ण

मुंबई : मुंबईमधील ३,०३९ जणांना करोनाची बाधा झाली असून ७१ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. मुंबईतील रुग्ण दुप्पटीचा कालावधी १३८ दिवसांवर, तर रुग्ण करोनामुक्त होण्याचे प्रमाण ९० टक्क्यांवर पोहोचले आहे.

मुंबईमधील करोनाबाधित रुग्णांची संख्या हळूहळू कमी होऊ लागली आहे. शुक्रवारी ३,०३९ जणांना बाधा झाल्यानंतर मुंबईतील एकूण करोनाबाधितांची संख्या सहा लाख ७१ हजार ३९४ वर पोहोचली आहे. विविध रुग्णालयात उपचार घेणारे ४५ पुरुष आणि २६ महिलांचा शुक्रवारी करोनामुळे मृत्यू झाला. यापैकी ४३ रुग्णांना दीर्घकालीन आजार होते. आतापर्यंत १३ हजार ६८७ जणांचा करोनामुळे मृत्यू झाला आहे.

विविध रुग्णालयांमध्ये उपचार घेणारे ४,०५२ रुग्ण करोनामुक्त झाले असून आतापर्यंत करोनामुक्त झालेल्यांची संख्या सहा लाख सहा हजार ४३५ वर पोहोचली आहे. विविध रुग्णालयांमध्ये आजघडीला ४९ हजार ४९९ करोनाबाधित रुग्ण उपचार घेत आहेत.

करोनाबाधित रुग्णांचा शोध घेण्यासाठी शुक्रवारी ३५ हजार २२४ चाचण्या करण्यात आल्या. आतापर्यंत ५६ लाख ४४ हजार ४०२ चाचण्या करण्यात आल्या आहेत. करोनाची बाधा झालेल्या रुग्णांच्या संपर्कात आलेल्या अतिजोखमीच्या गटातील २७ हजार ७३५ संशयीत रुग्णांचा शोध घेण्यात आला असून यापैकी ९२४ संशयीत रुग्णांना संस्थात्मक विलगीकरण केंद्रात दाखल करण्यात आले आहे. उर्वरित संशयीत रुग्णांना अटीसापेक्ष गृहविलगीकरणात राहण्याची परवानगी देण्यात आली आहे.

करोनाबाधित रुग्ण सापडल्यामुळे ९६ ठिकाणे (झोपडपट्ट्या आणि चाळी) प्रतिबंधित, तर ६१७ इमारती व इमारतींमधील ८,६५८ मजले टाळेबंद करण्यात आले आहेत.

बाधित मुलांसाठी वेगळी नियमावली

मुंबई महापालिकेचा निर्णय, उपचारांसाठी खास आराखडा

प्रसाद रावकर, लोकसत्ता

मुंबई : आगामी काळात लहान मुलांना करोनाचा संसर्ग होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्याची गंभीर दखल घेत मुंबई महापालिकेने कृतिदलाच्या मदतीने नऊ वर्षांपर्यंतच्या आणि १० ते १९ वर्षांच्या मुलांसाठी नवी स्वतंत्र नियमावली आणि कार्यपद्धतीचा आराखडा तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. भविष्यात उभारण्यात येणाऱ्या जम्बो करोना केंद्रांमध्ये लहान मुलांसाठी स्वतंत्र कक्षाची व्यवस्था करण्यात येणार असून तेथे बालरोगतज्ज्ञांच्या देखरेखीखाली बाधित मुलांवर उपचार करण्यात येणार आहेत.

मुंबईत फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापासून पुन्हा एकदा बाधितांची संख्या झपाट्याने वाढत आहे. बाधितांमध्ये नऊ वर्षांच्या आतील ११ हजार १४४ बालकांचा समावेश असून त्यातील १७ बालकांचा मृत्यू झाला आहे. तर १० ते २० वर्ष वयोगटातील २८ हजार ८६९ जण बाधित झाले आहेत. त्यातील ३३ जणांचा मृत्यू झाला आहे. आगामी काळात लहान मुलांना करोनाची बाधा झाली तर आणीबाणीची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी उपाययोजना करण्याचा निर्णय प्रशासन पातळीवर घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या आदेशानुसार कृतिदलाची मदत घेऊन लहान मुलांच्या विलगीकरणाबाबतचा मसुदा तयार करण्यात येत आहे. संसर्ग झालेली बालके आणि लहान मुलांची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने ठोस पावले उचलण्यात येत आहेत.



> भविष्यात लहान मुलांना करोनाची बाधा होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. ही बाब लक्षात घेऊन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या आदेशानुसार कृतिदलातील सदस्यांच्या मदतीने करोनाबाधित लहान मुलांसाठी नवी कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे.
>
> – सुरेश काकाणी, अतिरिक्त पालिका आयुक्त

सध्या बाधित मुलांसाठी स्वतंत्र नियमावली नाही. संसर्ग झालेल्या मुलांना काही जम्बो करोना केंद्रात वेगळे ठेवण्यात येत आहे. मात्र आता लहान मुलांना करोनाची बाधा होऊ लागल्यामुळे त्यांच्यासाठी नव्या नियमावलीची गरज भासत आहे, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

समस्या आणि उपाय

सध्या बाळ आणि त्याच्या मातेला करोनाचा संसर्ग झाल्यास त्या दोघांना एकमेकांपासून दूर ठेवण्यात येते. गरजेनुसार काही वेळापुरतेच मातेजवळ बाळाला ठेवले जाते. या दोघांपैकी एकाला संसर्ग झाला असेल तरीही अशीच काळजी घेण्यात येत आहे. परंतु ९ वर्षांच्या आतील बाधित बालकांना विलगीकरणात ठेवण्यात अडचणी येतात. काही मुले पालकांशिवाय राहू शकत नाहीत. त्या दृष्टीने विलगीकरणाबाबत नव्या नियमावलीत विचार करण्यात येत आहे. त्याचबरोबर १० ते २० वर्षांच्या करोनाबाधित मुलांसाठी नव्या जम्बो केंद्रांमध्ये स्वतंत्र कक्ष उभारण्यात येणार आहे. तेथे केवळ समवयस्क मुलेच असतील. तसेच बालरोगतज्ज्ञांची तेथे नेमणूक करण्यात येणार आहे.

बालकांसाठी मुंबईत पालिकेचे ५०० खाटांचे ‘जम्बो करोना केंद्र’

संदीप आचार्य, लोकसत्ता

मुंबई : करोनाच्या तिसऱ्या लाटेत लहान मुलांना करोनाचा सर्वाधिक त्रास होऊ शकतो, हे तज्ज्ञांचे मत लक्षात घेऊन ५०० खाटांचे लहान मुलांचे स्वतंत्र जम्बो कोविड केंद्र सुरू करण्यात येणार असून याशिवाय सहा हजार खाटांची तीन स्वतंत्र जम्बो कोविड केंद्रे उभारण्यात येणार असल्याचे मुंबई महापालिका आयुक्त इक्बालसिंग चहल यांनी ‘लोकसत्ता’ला सांगितले.

आयुक्तांनी राबवलेल्या करोना नियंत्रण कार्यक्रमाची दखल घेत जम्बो केंद्र उभारणीसह अत्यावश्यक बाबींसाठी ५० कोटी रुपयांचा निधी कंपन्यांच्या सामाजिक बांधिलकी (सीएसआर) निधीतून देण्यात आला आहे.

पालिकेच्या तब्बल २० हजार खाटांच्या रुग्णालयांसाठी प्राणवायूनिर्मितीही पालिका स्वतःच करणार असून यापुढे राज्य सरकार किंवा केंद्र सरकारवर प्राणवायूसाठी अवलंबून राहावे लागणार नाही, असेही आयुक्त चहल यांनी सांगितले.

तिसरी लाट ही लहान मुलांसाठी जास्त त्रासदायक ठरेल, असे तज्ज्ञ मंडळींचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्याबरोबर बैठक झाली. यात लहान मुलांवरील उपचारासाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी बालरोग तज्ज्ञांचा टास्क फोर्स तयार करण्यात आला आहे.



अनेक कंपन्या व उद्योग समूह मुंबई महापालिकेला करोनाच्या लढाईत मदत करण्यासाठी पुढे आल्या आहेत. करोनाच्या पहिल्या लाटेत मुंबई महापालिकेला ‘सीएसआर’ मधून केवळ पाच कोटी रुपयांचा निधी मिळाला होता. आता अवघ्या दोन दिवसात ५० कोटी रुपयांचा निधी मिळाला असून तीन मोठे उद्योग लवकरच त्यांची मदत जाहीर करणार असल्याचे चहल यांनी सांगितले. यापैकी ३५ कोटी रुपये एकट्या ‘एचडीएफसी’ने जाहीर केले असून यातून ऑक्सिजन प्लांट तसेच वरळीचे जम्बो केविड रुग्णालय उभे केले जाणार आहे. याशिवाय डिझ्ने व स्टार वाहिनीचे माधवन यांनी लंडन येथून दूरध्वनी करून साडेबार कोटी रुपयांचे ९० व्हेंटिलेटर देण्याचे जाहीर केले आहे. याशिवाय दिग्गज अभिनेते अमिताभ बच्चन यांनी एक कोटी रुपयांचा धनादेश दिल्याचे आयुक्तांनी सांगितले. आगामी काळात एकूण ११ जम्बो कोविड रुग्णालये असतील. या रुग्णालयात सुमारे २० हजार खाटा असणार आहेत व ही सर्व रुग्णालये ऑक्सिजन १०० टक्के बाबत स्वयंपूर्ण असतील, असे आयुक्त चहल यांनी सांगितले.

मुंबईत वरळी येथे पालिकेच्या माध्यमातून ५०० खाटांचे लहान मुलांसाठी जम्बो कोविड केंद्र उभारण्यात येणार असल्याचे आयुक्त चहल यांनी सांगितले. एक वर्ष ते १८ वर्षे वयोगटातील मुलांना येथे दाखल केले जाणार असून लहान मुलांबरोबर आई असणे गरजेचे आहे, हे लक्षात घेऊन क्युबिकल पद्धतीने या जम्बो केंद्राची निर्मिती केली जाणार आहे. यापैकी ७० टक्के प्राणवायू खाटा असतील तर २०० अतिदक्षता विभागातील खाटा असणार आहेत, असे आयुक्तांनी सांगितले. हे लहान मुलांचे जम्बो कोविड केंद्र ३१ मे पूर्वी उभे करण्याचा आमचा मानस आहे. याशिवाय प्रत्येकी दोन हजार खाटांची आखणी तीन जम्बो कोविड रुग्णालये उभारण्याचे काम सुरु झाले आहे. यातील एक मालाड येथे तर सायनच्या सोमय्या मेडिकल सेंटर आणि कांजुरमार्गच्या क्रॉम्प्टन कंपनीत नवीन जम्बो रुग्णालये उभी करण्यात येतील. आताची चारही जम्बो कोविड रुग्णालये उभारताना त्याचा आवश्यकतेनुसार विस्तार करण्याची योजना आखण्यात आली आहे. या सर्व केंद्रात गरजेनुसार प्रत्येकी दोन हजार याप्रमाणे सहा हजार अधिकच्या खाटा उभारता येणार असल्याचे आयुक्त चहल यांनी सांगितले.

ठाण्यातही ज्येष्ठांसाठी ‘ड्राइव्ह इन’ लसीकरण

लोकसत्ता खास प्रतिनिधी

ठाणे : मुंबईपाठोपाठ आता ठाणे महापालिकेनेही ६० वर्षांपुढील नागरिकांसाठी शहरात ड्राइव्ह इन लसीकरण मोहीम राबविण्याचा निर्णय शुक्रवारी घेतला आहे. या मोहिमेचे धोरण लवकरच तयार करून त्याप्रमाणे ती शहरात राबविली जाणार आहे. मात्र, त्यासाठी ऑनलाईन नोंदणी करणे बंधनकारक असणार आहे, असे पालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

ठाणे शहरातील लसीकरणाचा आढावा घेण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी शुक्रवारी पालिका मुख्यालयात बैठक आयोजित केली होती. महापौर नरेश म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीला पालिका पदाधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये मुंबईच्या धर्तीवर शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार गृहसंकुलातील नागरिकांना खासगी रुग्णालयाशी संलग्न होऊन लसीकरणासाठी मान्यता देण्याबाबत धोरण निश्चित करणे आणि ६० वर्षांपुढील नागरिकांसाठी ड्राइह इन लसीकरण धोरण ठरवून मध्यवर्ती जागा निश्चित करणे, असा निर्णय घेण्यात आला. ६० वर्षांपुढील नागरिकांना ड्राइव्ह इन लसीकरणासाठी ऑनलाईन नोंदणी करणे बंधनकारक आहे. ही मोहिम कशाप्रकारे राबवायची याचे धोरण तयार करून त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. यामुळे ज्येष्ठ नागरिकांना लसीकरणासाठी रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नसून त्यांना वाहनामध्येच लस उपलब्ध होणार आहे, असे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

ठाणे जिल्ह्यात आणखी २,२७४ करोना रुग्ण

ठाणे : ठाणे जिल्ह्यात शुक्रवारी २ हजार २७४ करोना रुग्ण आढळून आले. तर, ५२ जणांचा मृत्यू झाला. जिल्ह्यात आतापर्यंत ४ लाख ८४ हजार ७६९ रुग्ण आढळले असून ७ हजार ९३५ जणांचा मृत्यू झाला आहे.

जिल्ह्यातील २ हजार २७४ करोनाबाधित रुग्णांपैकी कल्याण डोंबिवली क्षेत्रात ७१४, ठाणे महापालिका क्षेत्रात ४४५, ठाणे ग्रामीण ३७४, नवी मुंबई २५८, मिरा भाईंदर २३७, बदलापूर १०१, उल्हासनगर ६२, अंबरनाथ ६२, भिवंडीत २१ रुग्ण आढळून आले.

नागपूरच्या वाट्याचा प्राणवायू पळवण्याचा प्रयत्न

नागपूर : भिलाईहून नागपूरसाठी प्राणवायू घेऊन निघालेले चार टँकर्स परस्पर इतरत्र पळवण्याचा प्रयत्न प्रशासनाच्या सतर्कतेमुळे उधळण्यात आला. चारपैकी दोन टँकर नागपुरात पोहचले असून उर्वरित दोनही परतीच्या मार्गावर आहेत.

रुग्णालयांना पुरवठा करण्यासाठी भिलाई येथून टँकर्सद्वारे नागपूरला प्राणवायू आणला जातो. आरटीओ आणि पोलिसांनी टँकरचे ‘लोकेशन’ घेतले असता दोन टँकर देवरी (गोंदिया जिल्हा) जवळ तर दोन नागपूर ओलांडून औरंगाबादपर्यंत गेल्याचे तपासात उघड झाले होते.

‘ना विकास क्षेत्रां’तील बांधकामांबाबतच्या केंद्राच्या परिपत्रकाला स्थगिती

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : पर्यावरणाचा ऱ्हास होत असताना केंद्र सरकारला उद्योगांची चिंता का, असा प्रश्न उच्च न्यायालयाने शुक्रवारी उपस्थित केला. तसेच सागरी किनारा भागांतील (सीआरझेड) ‘ना विकास क्षेत्रां’ना असलेले संरक्षण कमी करून त्यात बांधकामांना परवानगी देणाऱ्या केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या २०१९च्या परिपत्रकालाही न्यायालयाने स्थगिती दिली.

या परिपत्रकाच्या आधारे सीआरझेड परिसरात बांधकामांना परवानगी देण्यात आली असेल वा परवानगीशिवाय केलेली बांधकामे नियमित करण्यासाठी अर्ज आला असल्यास अशा व्यक्ती वा उद्योगाला याचिका, स्थगितीचा आदेश आणि परिपत्रकानुसार देण्यात आलेली परवानगी ही न्यायालयाच्या अंतिम



आदेशाला अधीन असेल, याची माहिती देण्याचे आदेशही मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारला दिले.

सीआरझेड क्षेत्राचे संरक्षण कमी करणाऱ्या केंद्र सरकारच्या परिपत्रकाच्या वैधतेला ‘वनशक्ती’ या संस्थेने जनहित याचिकेद्वारे आव्हान दिले असून ती बेकायदा ठरवण्याची मागणी केली आहे. २०११च्या अधिसूचनेनुसार ‘ना विकास क्षेत्रां’च्या माध्यमातून सागरी किनारा भागांना संरक्षण देण्यात आले होते. मात्र केंद्र सरकारच्या २०१९च्या परिपत्रकाने ‘ना विकास क्षेत्रां’ना मोठ्या प्रमाणात कात्री लावून सागरी किनारा भागांचे संरक्षण कमी केले. परिणामी या भागांतील विकासकामांवरील मर्यादाही शिथिल झाली आहे. हे परिपत्रक घटनाबाह्य, मनमानी करणारे आणि आरोग्यदायी वातावरणात जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन करणारे आहे, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे.

अत्यावश्यक असेल तरच अटक करा !

औरंगाबादः राज्यातील तुरुंगात कैदी ठेवण्याची क्षमता संपली असल्याने करोना संसर्गाची स्थिती लक्षात घेता या पुढे अत्याआवश्यक असेल तरच आरोपींना अटक करावे, असे आदेश कारागृहाचे अपर पोलीस महासंचालक सुनील रामानंद यांनी बजावले आहेत. ४६ कारागृहांची बंदिवान ठेवण्याची क्षमता २३ हजार २१७ एवढी असून सद्याच्या स्थितीमध्ये ३४ हजार ८९६ कैदी आहेत.\ क्षमतेपेक्षा ११ हजार ६७९ कैदी अधिक आहेत. पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत कारागृहात संसर्ग वाढू शकतो असे लक्षात आले असल्याने आरोपीची अटक अत्यावश्यक असेल तरच करा, असे निर्देशित करण्यात आले आहे. करोना संसर्ग वाढत असल्याने एप्रिल महिन्यापर्यंत २ हजार ६६४ जणांना तातडीने पॅरोल मंजूर करण्यात आले होते. नाशिक, औरंगाबाद, येरवडा, पैठण येथील खुले कारागृह येथून तीनशेपेक्षा अधिक जणांना सुटीवर जाण्याची परवानगी देण्यात आली. मात्र अजूनही तुरुंग भरलेले आहेत. सर्वाधिक कैदी पुणे येथील येरवडा कारागृहात असून या कारागृहाची क्षमता २४४९ असून सध्या या कारागृहात सहा हजार ८८ कैदी आहेत. अशीच स्थिती सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, मुंबई, ठाणे, तळोजा, कल्याण येथील कारागृहांतील संख्या क्षमतेपेक्षा खूप अधिक आहे. अशा स्थितीमध्ये करोना संसर्ग झाला तर आरोग्य यंत्रणेवर अधिक ताण येईल हे लक्षात घेऊन अटक अत्यावश्यक असेल तरच करा, असे आदेश बजावण्यात आले आहेत. या अनुषंगाने बोलताना एक वरिष्ठ पोलीस अधिकारी म्हणाले, सर्वसाधारणपणे अटक केलेल्या आरोपीस आता पोलीस कोठडी मिळत आहे. त्यामुळे अधिक काळापर्यंत कारागृहात व्यक्ती ठेवण्याची वेळ येत नाही. अटक करण्याची एक प्रक्रिया असते. पण अत्यावश्यक असेल तरच अटक करा, असे आदेश देण्यात आले आहेत.

No. 1/21-22

सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ क्लासिकल तामिळ

(शिक्षण मंत्रालय, भारत सरकार अधीन एक स्वायत्त संस्था)

नं. 40, 100 फिट रोड, आयआरटी कॅम्पस, तारामणी, चेन्नई-600113.

अर्जांकरिता निमंत्रण

१. क्लासिकल तामिळ टेक्स्ट्स ट्रान्सलेशन प्रोजेक्ट, मणिमेगालय ट्रान्सलेशन प्रोजेक्ट व थिरुक्कुरल ट्रान्सलेशन प्रोजेक्टकरिता भाषांतरतज्ज्ञांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

२. वर्ष 2021-23 करिता डॉक्टरल फेलोशिप / पोस्ट - डॉक्टरल फेलोशिपच्या पुरस्काराकरिता अर्हताप्राप्त उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

अर्ज स्वीकृतीची शेवटची तारीख **18.06.2021** आहे.

तपशील व अर्ज प्रारूप याकरिता कृपया **www.cict.in** या आमच्या वेबसाइटला भेट द्यावी.

संचालक

PUBLIC NOTICE

This is to inform the general public that Original Share Certificate no. 214, Distinctive Nos from 1066 to 1070 of **Late Shri. Shrikant Dattatraya Pednekar** an ex. Member of Satya Darshan Co-op. Hsg. Soc. Ltd., having address at Malpa Dongari No.3, Andheri (E.), Mumbai 400093 have been lost/misplaced. The present member of the Society Mrs. Pushpalata Shrikant Pednekar [having become the Member being sole nominee, on the death of Late Shri. S.D. Pednekar] has applied for duplicate shares. The Society, hereby, invites claims and objections from claimants objector or objectors for issuance of duplicate Share Certificate within the period of 14 (fourteen) days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for issuance of duplicate Share Certificate to the Secretary of Satya Darshan Co-op. Hsg. Soc. Ltd. If no claims/objections are received within the period prescribed above, the Society shall be free to issue duplicate Share Certificate in such manner as is provided under the bye-laws of the Society. The claims/objections, if any, received by the Society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the Society.

For and on behalf of Satya Darshan CHSL.
Sd/-
Date: 08/05/2021
Place: Mumbai
Hon. Secretary

MSME
Ministry of Micro, Small & Medium Enterprises
IDEMI (A Govt. of India Society)
Organized By IDEMI Mumbai Ministry of MSME Govt. of India
Start up your own E-Charging Station & Retro Fitting Business
Electric Vehicle Charging Station & Retro Fitting Business
Course Duration: 4 days
(ONLINE)
Date: 15,16,22, 23 May 2021
Time: 01.30 PM To 05.30 PM
email Id:training@idemi.org www.idemi.org
Technical Details: 83292 81625
After Successful Completion Certificate will be issued by Govt. of India
Fees:4000+18%GST in the name of IDEMI, Mumbai.
Contact: 8806614948 / 8600869044 / 7020016225

MAHAPREIT
Mahatma Phule Renewable Energy and Infrastructure Technology Limited
(Subsidiary of MPBCDC, a Government of Maharashtra undertaking)
INVITES
Applications for following post on 3 years contract period. Any eligible officer working in respective Govt Of Maharashtra department or PSU may also apply for deputation through proper channel.
1. Chief Operating Officer (COO)
2. CLSO (Chief Land and Survey Officer)
3. Affordable Housing – Project Dir (Housing)
4. Infrastructure Technologies Projects – Project Dir (Infra)
5. ETAP (Emerging Technology Area Projects) – Chief General Manager (CGM)
6. Climate change and Environment – CGM
7. Start–up Entrepreneurship Development and forward Integration (SEDFI) CGM (SEDFI)
8. Agro Processing value Chain and allied activities – Project Dir (APVC)
9. Public Relation Officer
The details of eligibility and terms of appointment is available on www.mahatmaphulecorporation.com Interested candidates may apply within 10 days to admin@mahapreit.in
ED (Maha PREIT)
Mumbai

कोलगेट-पामोलिव (इंडिया) लिमिटेड

सीआयएन: एल२४२००एमएच१९३७पीएलसी००२७००
नोंदणीकृत कार्यालय: कोलगेट रिसर्च सेंटर, मेन स्ट्रीट, हिरानंदानी गार्डन्स, पवई, मुंबई ४०००७६
दूर.: (०२२) ६७०९५०५० **फॅक्स:** (०२२) २५७०५०८८
ईमेल आयडी: investors_grievance@colpal.com
संकेतस्थळ: www.colgatepalmolive.co.in

सूचना

भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ च्या नियम ४७च्या अनुषंगाने याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, मार्च ३१, २०२१ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि आर्थिक वर्षासाठी लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा विचार करण्यासाठी, अन्य-बाबी, संमत करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक गुरुवार, मे १७, २०२१ रोजी होणार आहे.

संचालक मंडळाच्या बैठकीची सूचना कंपनीच्या **www.colgatepalmolive.co.in** या संकेतस्थळावरून प्राप्त करता येईल तसेच स्टॉक एक्स्चेंजच्या **www.bseindia.com** आणि **www.nseindia.com** या संकेतस्थळावरून देखील प्राप्त करता येईल.

कोलगेट-पामोलिव (इंडिया) लिमिटेडकरिता
के.रणधीर सिंग
कंपनी सचिव आणि मान्यता अधिकारी

ठिकाण: मुंबई
दिनांक: मे ०७, २०२१

ALKYL

अल्कील अमिन्स केमिकल्स लिमिटेड

नोंदणी. कार्यालय : ४०१-४०७, निर्माण व्यापार केंद्र, प्लॉट क्र. १०, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३. । **दूर. क्र. :** ०२२-६७९४६६१८ । **फॅक्स :** ०२२-६७९४६६६६
ई-मेल : legal@alkylamines.com । **संकेतस्थळ :** www.alkylamines.com
सीआयएन : एल९९९९९एमएच१९७९पीएलसी०२१७९६

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँण्ड डिस्क्लोझर रिक्वायरमेन्ट्स) नियमावली, २०१५च्या नियम ४७ सह वाचल्या जाणाऱ्या नियम २९च्या अनुषंगाने याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, मार्च ३१, २०२१ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि वर्षासाठी लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा विचार करण्यासाठी, अन्य बाबी संमत करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक गुरुवार, मे २७, २०२१ रोजी होणार आहे.

सदर माहिती कंपनीच्या www.alkylamines.com या संकेतस्थळावरदेखील प्रसिद्ध करण्यात आली आहे आणि www.bseindia.com आणि www.nseindia.com या संकेतस्थळांवरदेखील पाहता येईल.

अल्कील अमिन्स केमिकल्स लमिटेडकरिता
सही/-
चिंतामणी डी. थत्ते
महाव्यवस्थापक (सचिवालय)
आणि कंपनी सचिव

ठिकाण : नवी मुंबई
दिनांक : ०६.०५.२०२१

Godrej agrovet

गोदरेज अॅग्रोवेट लिमिटेड

कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर : L15410MH1991PLC135359
नोंदणीकृत कार्यालय : गोदरेज वन, ३ रा मजला, पिरोजशानगर, पूर्व द्रुतगती महामार्ग, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०० ०७९, महाराष्ट्र, भारत.
वेबसाइट : www.godrejagrovet.com **दूर.** + ९१-२२-२५१९ ४४१६ **फॅक्स** +९१-२२-२५१९ ५१२४ **ई-मेल :** gavlinvestors@godrejagrovet.com

दि. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताच्या लेखापरीक्षित एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा सारांश

(रु. कोटीमध्ये)

अ. क्र.	तपशील	३१.०३.२०२१ रोजी संपलेली तिमाही (लेखापरीक्षित)	३१.१२.२०२० रोजी संपलेली गत तिमाही (अलेखापरीक्षित)	३१.०३.२०२० रोजी संपलेल्या गत वर्षातील अनुषंगिक तिमाही (लेखापरीक्षित)	३१.०३.२०२१ रोजी संपलेले वर्ष (लेखापरीक्षित)	३१.०३.२०२० रोजी संपलेले वर्ष (लेखापरीक्षित)
१	परिचालनातून एकूण उत्पन्न	१,४६२.४८	१,५२६.१५	१,६२७.६८	६,२६६.७१	६,९६४.०४
२	कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक बाबी पूर्व#)	७८.५७	९०.११	९५.९९	४५३.१०	३५८.५५
३	करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबीपश्चात#)	७८.५७	९०.११	८६.०७	४५३.१०	३४८.६३
४	करपश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबीपश्चात#)	६३.३८	६८.०९	६९.२०	३४७.५७	३००.५८
५	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता (कर व अनियंत्रित व्याजापश्चात) नफा/(तोटा) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (कर व अनियंत्रित व्याजपश्चात) यांचा समावेश)	५९.०२	६१.४४	७२.२१	३१६.९७	३०२.४५
६	समभाग भांडवल (प्रतिशेअर रु. १०/- दर्शनी मूल्य)	१९२.०७	१९२.०७	१९२.०४	१९२.०७	१९२.०४
७	गत वर्षीच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळता)				१,८५९.०३	१,६४६.१०
८	उत्पन्न प्रति समभाग (प्रतिशेअर रु. १०/- दर्शनी मूल्य) (खंडित कामकाज व अखंडित कामकाजाकरिता) (अवार्षिकीकृत)					
	१. मूलभूत (रु.)	२.९५	३.२१	३.८९	१६.३४	१५.९४
	२. सौम्यीकृत (रु.)	२.९५	३.२१	३.८९	१६.३३	१५.९४

स्थायी लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांची प्रमुख वित्तीय वैशिष्ट्ये

(रु. कोटीमध्ये)

अ. क्र.	तपशील	३१.०३.२०२१ रोजी संपलेली तिमाही (लेखापरीक्षित)	३१.१२.२०२० रोजी संपलेली गत तिमाही (अलेखापरीक्षित)	३१.०३.२०२० रोजी संपलेल्या गत वर्षातील अनुषंगिक तिमाही (लेखापरीक्षित)	३१.०३.२०२१ रोजी संपलेले वर्ष (लेखापरीक्षित)	३१.०३.२०२० रोजी संपलेले वर्ष (लेखापरीक्षित)
१	परिचालनातून एकूण उत्पन्न	९६३.८३	१,०७७.२०	१,१५३.७२	४,४१३.०४	५,११८.६८
२	करपूर्व नफा	४३.२३	८९.३१	१०१.८०	३५२.५६	३५९.२२
३	करपश्चात नफा	३३.५५	७६.२१	७९.०६	२७९.००	२९३.३१
४	एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात)	३६.२१	७५.८६	७७.६६	२८१.७१	२९०.८६

टीपा :-

ए) वरील तपशील हा भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सूचिबद्धता अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे दाखल करण्यात आलेल्या दि. ३१.०३.२०२१ रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताच्या स्थायी व एकत्रित लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. दि. ३१.०३.२०२१ रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताच्या स्थायी व एकत्रित लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचे विस्तृत प्रारूप बीएसई लिमिटेड (www.bseindia.com) वर तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) च्या वेबसाइटवरही उपलब्ध आहे. सदर तपशील कंपनीच्या वेबसाइटवरही (www.godrejagrovet.com) उपलब्ध आहे.

बी) वरील वित्तीय निष्कर्षांचे लेखापरीक्षण समितीद्वारे पुनरावलोकन करण्यात आले असून त्यांची शिफारस करण्यात आली आहे व कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे त्यांच्या शुक्रवार, दि. ७ मे, २०२१ रोजी पार पडलेल्या सभेत त्यांना मंजुरी देण्यात आली आहे. कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील निष्कर्षांचे लेखापरीक्षण केले आहे व त्यांनी असुधारित लेखापरीक्षण मत व्यक्त केले आहे.

सी) आपल्या महत्त्वाच्या कामकाजावर लक्ष केंद्रित करण्याच्या उद्देशाने कंपनीने दि. ३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या वर्षादरम्यान आपल्या रियल इस्टेट प्रोजेक्टची गोदरेज प्रॉपर्टीज लिमिटेडला अंशत: विक्री केली व रु. ९.६० कोटीच्या (दि. ३१.०३.२०२० रोजी संपलेल्या गत वर्षाकरिता रु. १३४.६८ कोटी) महसुलाचा अन्य परिचालन महसुलामध्ये समावेश केला.

डी) दि. ३१.१२.२०२० रोजी संपलेली तिमाही व दि. ३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या वर्षाकरिताच्या स्थायी वित्तीय निष्कर्षांमधील अन्य उत्पन्नामध्ये संयुक्त उद्यमांकडून प्राप्त लाभांश म्हणून अनुक्रमे रु. ३३.०१ कोटी व रु. ५९.४६ कोटींच्या उत्पन्नाचा समावेश आहे. एकत्रित वित्तीय निष्कर्षांवर याचा कोणताही परिणाम नाही.

ई) कोव्हीड - १९ महामारीसंदर्भात, व्यवस्थापनाने माहितीच्या अंतर्गत व काही बाह्यस्थ स्रोतांचा विचार केला आहे, यामध्ये त्यांच्या वित्तीय निष्कर्षांच्या विविध घटकांवरील प्रभावाचा विचार करताना वित्तीय निष्कर्षांच्या मंजुरीच्या तारखेपर्यंत आर्थिक भवितव्य व उद्योग अहवाल यांचा समावेश आहे. संवेदनशील विश्लेषणासहित व्यवस्थापनाने निर्णय, अंदाज व वापर यांच्या अंमलबजावणीत दूरदर्शीपणाच्या धोरणांचा वापर केला व विद्यमान अंदाजांच्याआधारावर व्यवस्थापनास वस्तुसूची, स्वीकाराहं व्यापार, सद्भावना, अमूर्त संपत्ती व गुंतवणुका यांच्या रकमांच्या पूर्ण वसुलीची अपेक्षा आहे.महामारीच्या कारणास्तव जागतिक स्वास्थ्याच्या प्रभावावरील तत्कालीन प्रभाव हा सदर वित्तीय निष्कर्षांच्या तारखांनुसार या अंदाजांहून वेगळा असू शकेल.

एफ) गत वित्तीय वर्षादरम्यान कोव्हिड - १९ महामारीच्या उद्रेकाच्या कारणास्तव गोदरेज टायसन फूड्स लिमिटेड - एक उपकंपनी यांचा व्यवसाय विक्री व नफ्यासंदर्भात विपरीत परिणाम झाला. वित्तीय वर्षाच्या गत काही आठवड्यांमध्ये पोल्ट्री वापरामध्ये कोव्हिड - १९ शी संबंधित अफवांच्या कारणास्तव पोल्ट्री व संबंधित घटकांमधील दर व मागणीमध्ये मोठी घसरण झाली होती.

या कारणास्तव संबंधित उप कंपनीला रु. ३.०० कोटींपर्यंतच्या संपुष्टात आलेल्या व निर्लेखित करण्यात आलेल्या वस्तुसूचीच्या हानीची भरपाई करण्यासाठी काही वेगळ्या उपाययोजनांची अंमलबजावणी करावी लागली. मार्च २०२० अखेरीस दरांमधील घसरणीमुळे सदर उप कंपनीला जैविक संपत्तीच्या नि:पक्ष मूल्यांकनासंदर्भात रु. ६.९२ कोटींचा तोटा झाला. सदर एकूण तोटा हा दि. ३१.०३.२०२० रोजी संपलेल्या गत वर्षाकरिता रु. ९.९२ कोटी इतका अपवादात्मक बाबींअंतर्गत घोषित आहे.

जी) दि. ३१.०३.२०२० रोजी संपलेल्या गत वर्षादरम्यान कंपनीने कराधान कायदे (सुधारणा) अधिनियम, २०१९ अंतर्गत विहित आयकर कायदा, १९६१ च्या अनुच्छेद ११५ बीएए अंतर्गत मंजुर पर्यायांचा वापर करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार कंपनीने दि. ३१.०३.२०२० रोजी संपलेल्या गत वर्षादरम्यान सदर अनुभागामध्ये विहित दराच्या आधारावर आयकराकरिताच्या तरतुदी व त्यांच्या विभाजित कर शिलकीच्या पुन:गणनांच्या तरतुदींना मंजुरी दिली.

एच) दि. ३१.०३.२०२१ व दि. ३१.३.२०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरिताची आकडेवारी ही संपूर्ण वित्तीय वर्ष आणि संबंधित वित्तीय वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीपर्यंत प्रसिद्ध करण्यात आलेल्या वर्ष ते तारीख आकडेवारीसंदर्भात लेखापरीक्षित आकडेवारीदरम्यान ताळमेळ साधणारी आहे.

आय) संचालक मंडळाने कंपनीच्या समभाग भांडवलाच्या ८०% अंतिम लाभांशाची शिफारस केली आहे, जी दि. ३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता प्रत्येकी रु. १०/- च्या दर्शनी मूल्याच्या प्रति समभागाकरिता रु. ८/- इतकी आहे, जी बाब कंपनीच्या आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेत भागधारकांच्या मंजुरीच्या अधीन असेल.

गोदरेज अॅग्रोवेट लिमिटेड करिता
सही/-
बी. एस. यादव
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन क्रमांक : ००२९४८०३

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०७ मे, २०२१